# बृहन्मुंबई महानगरपालिका

## जाहीर सूचना

सार्वजनिक उद्दिष्टांसाठी राखीव असलेल्या महानगरपालिकेच्या जागेवरील समाजकल्याण केंद्राकरिता आरक्षित असलेल्या इमारती अनुज्ञा व अनुज्ञप्ती तत्त्वावर परिरक्षण व व्यवस्थापना करिता सार्वजनिक संस्थांना वाटप करण्यासंबंधीच्या धोरणास सुधार समिती ठराव क्र. १७२ दि. २०.०२.२०२० व महानगरपालिका ठराव क्र. १५९ दि. २४.११.२०२० अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर धोरणानुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मालकीच्या समाजकल्याण केंद्राकरिता आरक्षित असलेल्या बांधीव इमारती या विविध सार्वजनिक उद्दिष्टांसाठी जसे की, शिवणकामाचे प्रशिक्षण, अंतर्गत खेळ, प्रौढ शिक्षण अभियान, कुटुंब नियोजन कार्यक्रम, सांस्कृतिक, शैक्षणिक, स्त्री व मुलांचे संगोपनाचे कार्यक्रम, कल्याणकेंद्र, योगाभ्यासकेंद्र, विपश्यना केंद्र, कुटुंब कलहातील समुपदेशन, सामाजिक उद्दिष्टे इत्यादीकरिता वितरीत करता येतील. या अनुषंगाने नमूद समाजकल्याण केंद्र “गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासिका, किशोरी विकास वर्ग चालविणे, कॉलेज विद्यार्थ्यांसाठी मोफत पुस्तकपेढी चालविणे, फिरती विज्ञान प्रयोग शाळा” इ. उद्दिष्टांकरिता कार्य करणा-या पात्र संस्थेस वितरित करावयाचे आहे. त्यानुसार “गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासिका, किशोरी विकास वर्ग चालविणे, कॉलेज विद्यार्थ्यांसाठी मोफत पुस्तकपेढी चालविणे, फिरती विज्ञान प्रयोग शाळा” इ. उद्दिष्टांकरिता कार्य करणा-या संस्थांनी अर्ज सादर करावेत.

| **जागेचा तपशील** | **बांधीव सुविधेचे क्षेत्रफळ** |
|---|---|
| न.भू. क्र. १९५-अे, १९५-बी<br>कोंडिविटा गाव, अंधेरी (पूर्व). | क्षेत्रफळ - १७४.०१ चौ. मी.<br>(पहिला व दुसरा मजला) |

१) अर्ज करणारी संस्था धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयात संस्था नोंदणी अधिनियम त्याचप्रमाणे मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० या दोन्ही अधिनियमानुसार मागील ५ वर्षापासून (अर्ज मागविण्याच्या दिनांकापूर्वी) नोंदणीकृत असावी अथवा कंपनी कायद्यानुसार सदर कंपनी नोंदणीकृत असावी.

२) समाजकल्याण केंदाचे वाटप गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासिका, किशोरी विकास वर्ग चालविणे, कॉलेज विद्यार्थ्यांसाठी मोफत पुस्तकपेढी चालविणे, फिरती विज्ञान प्रयोग शाळा इ. उद्दिष्टांकरिता कार्य करणा-या पात्र संस्थेस वाटप करण्यात येणार असल्याने गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासिका, किशोरी विकास वर्ग चालविणे, कॉलेज विद्यार्थ्यांसाठी मोफत पुस्तकपेढी चालविणे, फिरती विज्ञान प्रयोग शाळा इ. बाबतचा ०३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक आहे व त्यासंदर्भात कागदोपत्री पुरावे अर्जासोबत सादर करणे.

३) संस्थेची मागील तीन वर्षाच्या कालावधीतील किमान वार्षिक उलाढाल रुपये ५,००,०००/- (रुपये पाच लाख) इतकी असावी. तथापि सदर उलाढाल संस्थेच्या पुढील आर्थिक वर्षाच्या प्रस्तावित खर्चाच्या ५०% पेक्षा कमी नसावी. मागील तीन वर्षाच्या कालावधीकरिता सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेला ताळेबंद अर्जासोबत सादर करावा लागेल.

४) संस्थेच्या नावे स्वतंत्र पॅन क्रमांक (आयकराचा स्थायी खाते क्रमांक) असावा.

५) संस्था आयकर प्रपत्र सादर करणारी / करदाती असावी आणि मागील ३ वर्षाचे आयकर विवरणपत्र सादर करण्यात यावे.

६) अर्जासोबत इसारा रक्कम रु.१०,०००/- रोखीत, पे ऑर्डर / डिमांड ड्राफ्ट च्या स्वरूपात B.M.C. च्या नावे महापालिकेस भरणा करण्यात यावी.

७) संस्थेचे सादरीकरण करीता गुणांकन असल्याने निवडीच्या वेळी संस्थेचे कार्य व इतर तपशिलासंदर्भात सर्वसमावेशक सादरीकरण करणे आवश्यक.

८) पात्र संस्थेस प्रथमतः ११ महिन्यांकरिता अनुज्ञा व अनुमती तत्वावर रु ५/- प्रती चौ. फूट प्रति महिना या दराने अनुज्ञप्ती शुल्काचा भरणा करावा लागेल.

९) पात्र संस्थेस दोन वर्षाच्या अनुज्ञप्ती शुल्काइतकी रक्कम व्याज विरहीत सुरक्षा ठेव म्हणून महानगरपालिकेकडे जमा करावी लागेल.

समाजकल्याण केंद्राचे वाटप "गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासिका, किशोरी विकास वर्ग चालविणे, कॉलेज विद्यार्थ्यांसाठी मोफत पुस्तकपेढी चालविणे, फिरती विज्ञान प्रयोग शाळा इ." या उद्दिष्टपुर्तीकरिता करण्यात येणार असल्याने निवडीदरम्यान मुल्यमापन करतांना खालील बाबींचाही प्राधान्याने विचार केला जाणार असल्याने संस्थांनी खालील बाबी संदर्भातील कागदोपत्री पुरावे अर्जासोबत सादर करावे.

१) संस्थेकडे सदर केंद्र चालविण्याबाबत पुरेसा प्रशिक्षित कर्मचारी वर्ग असल्याबाबतचा तपशिल अर्जासोबत सादर करणे आवश्यक.

२) संस्थेतर्फे लाभार्थी विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या प्रशिक्षणाबाबतचा तपशिल वर्षनिहाय आकडेवारी सहित सादर करावा.

३) संस्थेस प्राप्त गुणगौरव/प्रमाणपत्रे/ पारितोषिके यासंदर्भातील कागदोपत्री पुरावे.

४) संस्थेतर्फे गरजू विद्यार्थ्यांकरिता राबविण्यात आलेल्या योजना.

५) संस्थेकडून प्रशिक्षित करण्यात आलेल्या मुलांनी विविध क्षेत्रातील नैपुण्य/कौशल्य प्राप्त केल्यासदंर्भातील कागदपत्रे.

६) कोवीड कालावधीतील समाजकार्याकरिता पुरस्कार / प्रमाणपत्र प्राप्त संस्थांना विशेष प्राधान्य.

७) महाविद्यालयिन विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांच्या मदतीसाठी मोफत बुक बॅक चालविणा-या संस्थेस विशेष प्राधान्य.

८) मुलगी शिकली प्रगती झाली अभियाना अंतर्गत मुलींसाठी / किशोरींसाठी विशेष उपक्रम राबविणा-या संस्थांना विशेष प्राधान्य.

९) दूरस्थ / गरजू व गरीब विद्यार्थ्यांसाठी फिरती विज्ञान प्रयोगशाळा चालविणे.

सुलभ संदर्भाकरिता समाजकल्याण केंद्रांच्या वाटपाच्या धोरणाची प्रत महानगरपालिकेच्या https://portal.mcgm.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

समाजकल्याण केंद्राचे वाटप करताना "गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासिका, किशोरी विकास वर्ग चालविणे, कॉलेज विद्यार्थ्यांसाठी मोफत पुस्तकपेढी चालविणे, फिरती विज्ञान प्रयोग शाळा इ. हे उद्दिष्ट साध्य करावयाचे असल्याने या क्षेत्रात कार्य करणा-या संस्थांनी समाजकल्याण केंद्र वाटपाच्या मंजुर धोरणातील पात्रतेच्या निकषानुसार लेखी स्वरुपात आवश्यक कागदपत्रांसह आपले अर्ज **दि. १०.११.२०२३** पर्यंत दुपारी ०३.०० वाजेपर्यंत सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांच्या कार्यालयामध्ये सादर करावेत. विहित मुदती नंतर सादर केल्या जाणा-या अर्जांचा विचार करण्यात येणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

सहाय्यक आयुक्त (मालमत्ता) यांचे कार्यालय
बृहन्मुंबई महानगरपालिका (मुख्य कार्यालय),
विस्तारित इमारत, ४ था मजला,
फोर्ट, मुंबई – ४००००१.

सही/-

**सहाय्यक आयुक्त (मालमत्ता)**